# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य महाराष्ट्र State | जिल्हा मुंबई District | पोलीस ठाणे लाप्रवि Police Station | पहिली खबर क्र. 20 FIR No. | वर्ष 2026 Year | दिनांक 27/07/2026 Date

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधिनियम 1988 | कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ........ | कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ........ तारीख पासून Date from 18/12/2025 पासून वेळ Time रोजी तारीख पर्यंत Date to 29/12/2025 पर्यंत वेळ Time ........

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. | तारीख Date 22/12/2025 | वेळ Time ........

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 33 | तारीख Date 27/07/2026 | वेळ Time 18:05

4. माहितीचा प्रकार Type of Information समक्ष | लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........ | चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name खार | ठिकाणाचे नंबर No. if any पोलीस | गल्ली Ward ठाणे अंतर्गत | रस्त्याचे नाव Name of road बीट चौकी क्र. 1

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place खार | गाव Village (पश्चिम) | पोस्ट Post मुंबई | तालुका Taluka ........ | जिल्हा Dist. ........ | राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ | तालुका Taluka ........ | जिल्हा Dist. ........ | राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name श्री. अशोक गवारी | (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name लक्ष्मण

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 42 वर्षे | (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय | फोन नं. Phone No. 9022480244

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ | दिल्याचा दिनांक Date of issue ........ | दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ | (f) व्यवसाय Occupation नोकरी (पोनि.

(g) धर्म Religion हिंदू | जात Caste ........ | जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता Address शासकीय | गल्ली/सर्व्हे नं. Ward पोलीस | घर/नाव नं. House Name No. वसतीगृह | फोन/मो. नं. Phone No. वरळी | पॅन नं. Pan No. मुंबई | वोटर्स नं. Card No. ........

रस्त्याचे नाव Road ........ | जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ | गाव Village ........ | पोस्ट Post ........ | पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka ........ | जिल्हा Dist. ........ | राज्य State ........ | सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

लोकसेवक अनिल आव्हाड नेमणुक खार पोलीस ठाणे, मुंबई

[तक्रा]रदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... पडताळणी क्र. 94/2025 वरुन दाखल.
[R]easons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.
..........................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........................................
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........................................
Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.
यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी अर्जदार श्री. समीर मोडक यांचे अन्नदाता आहार केंद्र, बीट क्र. 1 खार पो. ठाण्याच्या हद्दीत चालवायचे असेल तर नमुद हॉटेलवर कोणतीही कारवाई न करण्यासाठी स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता लोकसेवक अनिल जाधव यांनी तक्रारदार यांचेकडून दरमहा रु. 5,000/- अशी लाचेची मागणी केली असल्याचे दि. 22/12/2025 रोजीच्या पडताळणी क्र. 94/25 च्या पडताळणी कारवाईदरम्यान पंचासमक्ष निष्पन्न झाल्याने यातील लोकसेवक अनिल जाधव यांचे विरुद्ध प्राप्त तक्रार अर्जावरुन कायदेशीर फिर्याद दिल्याने फिर्यादी यांचे फिर्यादीवरुन कलम 7 भ्र. प्र. अधि. 1988 अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ...... रजनी उंबरकर, पो.नि.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
..........................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .......................... जिल्हा .............. राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank ............. No. ........... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..........................................

(3) Transferred to P. S. ..................................
District .................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ...... रजनी उंबरकर
पदनाम Rank ...... पोलीस निरीक्षक
तपासिक अ. चा कोड क्र. Posting ...... ला. प्र. वि. मुंबई.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ...... 28/07/2026
1. Date and time of submitted to the Court.

Code No. of I. O. ..........................................

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

यातील फिर्यादी श्री. अशोक लक्ष्मण गवारे, पोनि, ला.प्र.वि. मुंबई विभाग यांची स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात आलेली फिर्यादी सबब हीच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

Ghorbadkar

(रजनी उंबरकर)
पोलिस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

जबाब

दिनांक २७/०७/२०२६

मी, श्री. अशोक लक्ष्मण गवारी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग कार्यालय, वरळी, मुंबई, रा.ठी. शासकीय पोलीस अधिकारी वसतीगृह, पहिला मजला, वरळी मुंबई ४०००३० मोबाईल क्र. ९०२२४८०२४४

मी सध्या लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग कार्यालय, वरळी, मुंबई येथे पोलीस निरीक्षक या पदावर माहे एप्रिल २०२५ पासून कार्यरत आहे. दिनांक २२/१२/२०२५ रोजी श्री. समीर स्वपन मोंडळ, व्यवसाय अन्नदाता आहार केंद्र, रेल्वे स्टेशन रोड नं. ०३, खार पश्चिम, मुंबई राहण्याचा पत्ता फ्लॅट नं १०८, २/ए विंग, प्रगती मंडल बिल्डिंग, मराठा कॉलनी, साईबाबा मंदिर जवळ, गोळीबार रोड, सांताक्रुझ पूर्व, मुंबई हे स्वत: लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई या ठिकाणी तक्रार देण्यास आले असता, मा. वरिष्ठांनी श्री. समीर मोंडळ यांच्या तक्रारीबाबत माझी चौकशी अधिकारी व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून पो.नि. संदिप गायकवाड यांची नेमणुक केली व पुढील कारवाई करणेबाबत लेखी आदेशित केले.

त्यानंतर तक्रारदार यांना त्यांची तक्रार लेखी स्वरूपात देण्यास सांगितले असता त्यांनी सांगितले की, त्यांचे बंगाली भाषेमध्ये इयत्ता ५ वी पर्यतचे शिक्षण झाले असून मराठी– हिंदी लिहिता येत नाही परंतु हिंदी भाषा समजते व वाचता येते त्यामुळे तक्रारदार यांच्या विनंतीवरून त्यांनी सांगितलेल्या हकिगती प्रमाणे त्यांचा तक्रारअर्ज आमचे कार्यालयातील लॅपटॉपवर हिंदी मध्ये टाईप केला, त्यामध्ये त्यांनी मागील ८ वर्षापासून खार पश्चिम स्टेशन रोड नं. ०३ जवळ अन्नदाता आहार केंद्र भाडेतत्वार चालवत असून, हॉटेलला झुणका भाकर केंद्र चालविण्याची परवानगी आहे परंतु त्यामध्ये हॉटेल व्यवसाय करतात. सदर हॉटेल व्यवसाय करावयाचा असल्यास त्यावर कोणतीही कारवाई करु नये, यासाठी हॉटेलच्या बाजुला असलेली खार पोलीस ठाणे अंतर्गतची बीट चौकी क्र. १ मधील पोलीस अनिल जाधव यांनी दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळच्या वेळेस तक्रारदार यांचे हॉटेल मध्ये जावुन तक्रारदार यांना सांगितले की, त्यांना सदर हॉटेल चालवायचे असल्यास पोलीस अनिल जाधव यांचेसाठी व पोलीस अधिकारी दत्तात्रय कोळी यांचे करीता दर महिन्याला रू. २,५००/– (अडीच हजार ) लाचेचा हप्ता दयावा लागेल, त्यानुसार पाठीमागील ०४ महिण्यांचे रू १०,०००/– (दहा हजार) पण दयावे लागतील आणि जर आपल्याला या बाबत काही बोलायचे असेल तर बीट नं. १ मध्ये येवुन साहेबांना येवुन भेटायला सांगितले. त्यावेळी पोलीस अनिल जाधव यांनी दर महिण्याचे रू. २,५००/– प्रमाणे पाठीमागील ०४ महिण्यांचे रू. १०,०००/– अशी लाचेची मागणी केली मात्र तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक २२/१२/२०२५ रोजी ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात समक्ष हजर होवुन आमचेकडे लेखी तक्रार दिली. सदरवेळी तक्रारदार हे त्यांचे मित्र श्री. भोजनाथ रिशीदेव राय यांचेसह कार्यालयात उपस्थित होते.

मी, पर्यवेक्षक अधिकारी पोनि संदिप गायकवाड यांचे सोबत चर्चा करून तातडीने पडताळणी कारवाई करण्याचे ठरविले. त्यानुसार प्रभारी पोलीस हवालदार ९६०२६४/शेमडकर यांना पंच व पथकाची नियुक्ती करण्याबाबत आम्ही सुचना दिल्या. आम्ही दिलेल्या सुचनांप्रमाणे पंच व पडताळणी पथकाची नियुक्ती केल्यानंतर काही वेळातच दोन शासकीय पंच आमचे समक्ष पोह शेमडकर यांचे सोबत हजर झाले तेव्हा त्यांना त्यांचे नाव व पद विचारले असता पंच श्री. दिनेश लक्ष्मण अंबाजी, वय ३५ वर्षे, व्यवसाय : नोकरी जिल्हा निबंधक, सहकारी संस्था (३) मुंबई, बांद्रा पुर्व मुंबई व पंच श्री. विनोद भास्कर राठोड, वय ४४ वर्षे, व्यवसाय : नोकरी, मा. जिल्हाधिकारी( अति/निष्का ) मुलुंड, अशी दोन्ही शासकीय पंचांची आम्ही ओळख करुन घेतल्यानंतर त्यांची तक्रारदार यांचेशी ओळख करुन देवून दि. २२/१२/२०२५ रोजीचा तक्रारदार यांच्या तक्रार अर्जाबाबत पंचाना समजावून सांगून तक्रारदार यांचा हिंदीमध्ये टंकलिखीत केलेला तक्रार अर्ज श्री. भोजनाथ रिशीदेव राय यांनी तक्रारदार श्री. समीर मोंडळ यांना हिंदी मधुन वाचुन दाखवला व समजावुन सांगितला. तसेच पंचाना वाचण्यास दिला व नमुद पडताळणी कारवाईमध्ये पंच म्हणून काम करण्याची विनंती

केली आम्ही केलेल्या विनंतीनुसार दोन्ही पंचानी पडताळणी कारवाईमध्ये पंच म्हणून स्वखुशीने काम करण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर सदर तक्रार अर्जावर पंचाच्या सहया घेण्यात आल्या व समक्ष म्हणुन आम्ही स्वाक्षरी केली तसेच पर्यवेक्षक अधिकारी म्हणून पोनि संदिप गायकवाड यांनी स्वाक्षरी केली. तसेच तक्रारदार यांचे मित्र भोजनाथ रिशीदेव राय यांनी साक्षीदार म्हणून स्वाक्षरी केली. सदर तक्रार अर्जाला पडताळणी क्र. ९४/२०२५ देण्यात आला.

पडताळणी कारवाईकरीता ठाणे दैनंदिनी क्रमांक ३१/२०२५, दिनांक २२/१२/२०२५ प्रमाणे नोंद घेवून आम्ही, पो.नि. संदिप गायकवाड, दोन्ही पंच व पडताळणी पथकासह १६:०० वाजता पडताळणी करीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयातुन शासकीय वाहनाने रवाना झालो. स्वामी विवेकानंद रोड, खार पश्चिम, मुंबई येथे पोहचताच तक्रारदार यांना लोकसेवक यांचे कार्यालय येथून किती अंतरावर आहे अशी विचारणा केली त्यावेळी तक्रारदार यांनी १० ते १५ मि. च्या अंतरावर लोकसेवक यांचे कार्यालय असल्याचे सांगितल्याने शासकिय वाहन थांबविण्यात आले.

सदर ठिकाणी थांबताच आम्ही डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सोनी कंपनीचे मॉडेल नं. क्र. ICD PX 333 Serial No. 2598554 ची माहिती देवून सदरचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर आम्ही पंचाना दाखविले. पोह ०४०३२१/यादव यांचे मदतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन दोन सेल टाकून तो सुरू करून, त्यानंतर पडताळणी कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन सॅनडिस्क कंपनीचे मायक्रो एस.डी.कार्ड नं. 5234DTET516A टाकून आमचे व तक्रारदार, दोन्ही पंच यांचे प्रथम वक्तव्य सुमो वाहन क्र. एमएच–०१–एएन– १९८४ मध्ये नॅशनल लायब्ररी, स्वामी विवेकानंद रोड, मुंबई येथे गाडीच्या काचा बंद करून ध्वनिमुद्रित करण्यात आले. त्यानंतर पडताळणी कारवाई करीता तक्रारदार व त्यांच्या सोबत त्यांचे मित्र श्री. भोजनाथ रिशिदेव राय व पंच क्रमांक ०१ श्री. दिनेश लक्ष्मण अंबाजी यांना लोकसेवक यांच्या कार्यालयात भेटीसाठी पाठविण्याचे ठरले. त्यानुसार टेक्निशियन पोह यादव यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून, तो तक्रारदार श्री. समीर स्वपन मोंडळ यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजुस असलेल्या बनियानला लावला व तक्रारदार यांना त्यांचे मित्र व पंचासह रवाना केले. ते काही वेळानंतर लोकसेवक यांच्या कार्यालयात जावून शासकिय वाहन थांबलेल्या ठिकाणी परत आले व सदर शासकिय वाहन उभे असलेल्या वाहनात बसले. त्यावेळी आम्ही, पो.ह. यादव यांच्या मदतीने तक्रारदार यांच्या आतील बनियनला लावलेला डीजीटल व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन बंद केला.

तक्रारदार श्री. समीर मोंडळ त्यांचेकडून लोकसेवक यांच्यासोबत झालेल्या संभाषनाबाबत माहिती घेतली तसेच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले त्यामध्ये तक्रारदार व लोकसेवक अनिल जाधव यांच्याशी भेट झाली सदरवेळी लोकसेवक " **बैठो, क्या बोल रहा है, कुछ दे दो, ऐसा आप बोले थे ना? मिल लो साब को**" असे बोलले असता, तक्रारदार यांचे मित्र श्री. भोजनाथ रिशिदेव राय म्हणाले " **हम आपको उस दिन दे रहा था, तो आप बोले की नही, साब से पहिले मिललो** " त्यावर लोकसेवक " क्या दे रहे थे? " असे म्हणाले असता भोजनाथ रिशिदेव राय म्हणाले " **पाकीट,** जो दो हजार, मै दे **रहा था।** " लोकसेवक जाधव यांनी " **इतने देने का?** " असे म्हणाले असता, तक्रारदार म्हणाले " आप **बताईये सर** " त्यावर लोकसेवक म्हणाले "**जो सब दे रहे है, तुम दे दो, बात खतम**" त्यावर तक्रारदार यांनी " **पाच** हजार, **महिने का, महिने का पाच हजार जादा है साब, थोडा हिसाबसे सर, हम लोग** भी भाडे पें चलाता हू, खुदका **तो नही है सर** " यावर लोकसेवक जाधव यांनी " **यहा खुदका किसीका** नही सब भाडे पें **ही** है। उसी **हिसाबसे हम लोग बोलते है। तुम बोलोना क्या करने का ? सामने पानी पुरीवाला** है। पाच हजार देता है। " असे बोलून पाच हजार रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर लोकसेवक जाधव यांनी " **काळे साहब २०:३० बजे के बाद आने वाले है तब आ जावो** " असे सांगितले त्यानुसार पुन्हा पडताळणी कारवाईसाठी तक्रारदार व पंच यांना पाठविण्याचे ठरविल्याने आम्ही सदर ठिकाणी थांबून राहिलो.

Dnyandan

[signature]

त्यानंतर पुन्हा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून, तो तक्रारदार श्री. समीर मोंडळ यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजुस असलेल्या बनियनाला लावला. ती वेळ २०:२६ वा.ची होती. पोनि गायकवाड यांच्या सुचनेप्रमाणे तक्रारदार श्री. समीर मोंडळ, त्यांचे मित्र श्री. भोजनाथ रिशिदेव राय व पंच क्र. १ श्री. दिनेश अंबाजी असे तिघे चालत लोकसेवक यांच्या कार्यालयाच्या दिशेने गेले. काही वेळानंतर ते पुन्हा आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी पो.ह. यादव यांच्या मदतीने तक्रारदार यांच्या आतील बनियनला लावलेला डीजीटल व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन बंद केला, त्यावेळी २०:३२ वाजले होते. तसेच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले त्यामध्ये तक्रारदार हे " नमस्कार कोली साब, आपसे सर मिलने आया था। " असे बोलले असता, त्यावेळी लोकसेवक जाधव यांनी "आरे काळे साबसे मिलो, जिधर जाना उधर जाने दो, काळे साब आ रहा है, उनसे बात करो, उनसे बात कर लिया, काळे साब से आके मिलो " असे सांगितले. सदरवेळी तक्रारदार यांना लोकसेवक यांनी काळे साहेब यांना भेटण्यास सांगितल्याने तक्रारदार यांना पुन्हा वेळ २०:४३ वा पोह यादव यांच्या मदतीने डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून, तो तक्रारदार श्री. समीर स्वपन मोंडळ यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजुस असलेल्या बनियनाला लावून तक्रारदार श्री. समीर मोंडळ, श्री. भोजनाथ रिशिदेव राय व पंच क्र. १ लोकसेवक यांना भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयात गेले. तक्रारदार व पंच हे तक्रारदार यांना भेटून परत आले, त्यावेळी पो.ह. यादव यांच्या मदतीने तक्रारदार यांच्या आतील बनियनला लावलेला डीजीटल व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन बंद केला त्यावेळी २०:४९ वाजले होते. तसेच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले त्यामध्ये लोकसेवक " काळे साब आ रहे है " असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी "तो क्या करू अभी सर" असे विचारले असता, लोकसेवक यांनी " तो रूको बाहर" असे सांगितले.

त्यानंतर २१: ३० वा. डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून, तो तक्रारदार श्री. समीर मोंडळ यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजुस असलेल्या बनियनाला लावला. तक्रारदार, पंच क्र. .१. व भोजनाथ रिशिदेव राय असे लोकसेवक यांना भेटण्याकरीता गेले. काही वेळा नंतर तक्रारदार व त्यांचे मित्र व पंच परत आले त्यावेळी पो.नि. गवारी यांनी पो.ह .यादव यांच्या मदतीने तक्रारदार यांच्या आतील बनियनला लावलेला डीजीटल व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन बंद केला, त्यावेळी २१:४३ वाजले होते. तसेच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले त्यामध्ये लोकसेवक म्हणाले " आये ही नही साब उधर है। चौकी पें इधर आये नही " तक्रारदार म्हणाले " आप तो बात कर लेते थे, तो हो जाता था " त्यानंतर लोकसेवक म्हणाले " अरे मैने बात किया है ना भाई फोन पर बात कर दिया है, तुम आयेगे तो साब मेरे को ही फोन करनेवाले है" असे सांगितले असता, तक्रारदार यांनी " आप तो जा रहे हो " असे विचारले असता, लोकसेवक यांनी " अरे मै जाने दे ना, मै यहासे गया तो भी साहब है ना, टेन्शन मत ले, चलो " असे संभाषण करुन निघुन गेले. त्याप्रमाणे लोकसेवक यांनी पुन्हा फोन करून भेटण्यास बोलाविले नंतर त्यांचे कार्यालयात भेटण्यास जाण्याचे ठरविण्यात आले, सदर दिवशी दोन्ही पंचासमक्ष पडताळणी पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर दिनांक २९/१२/२०२५ रोजी तक्रारदार श्री. समीर मोंडळ हे ला.प्र.वि. वरळी, मुंबई कार्यालयात समक्ष हजर झाले. लोकसेवक यांनी भेटण्यास बोलावले असल्याचे सांगितल्याने मी पडताळणी पथक व पंचास हजर राहण्यास सांगितले असता सदर दिवशी पंच श्री. दिनेश अंबाजी हे उपस्थित राहू शकत नसल्याने त्यांचे ऐवजी पंच श्री. सागर मटकर हे उपस्थित राहिल्याने त्यांना तक्रारदार यांचे तक्रार अर्ज वाचण्यास देऊन दिनांक २२/१२/२०२५ रोजी झालेल्या पडताळणी कारवाईची माहिती देण्यात आली. त्यानंतर मी, पो. नि. गायकवाड, पंच श्री. विनोद राठोड व श्री. मटकर, उर्वरित पडताळणी पथक, तक्रारदार, त्यांचे मित्र श्री. भोजनाथ रिशीदेव राय असे शासकिय वाहनाने ठाणे दैनंदिनी क्रमांक २७/२०२५, दिनांक २९/१२/२०२५ प्रमाणे नोंद घेवून रवाना झालो. त्यानंतर नॅशनल लायब्ररी, स्वामी विवेकानंद रोड, मुंबई या ठिकाणी जावून थांबलो. यावेळी तक्रारदाराच्या बनियानच्या आतमध्ये डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर लावून, पंच श्री. विनोद भास्कर

राठोड यांच्यासह तक्रारदारास खार बीट चौकी क्र. १ येथे लोकसेवक यांच्या कार्यालयात पाठविण्यात आले. तक्रारदार व पंच लोकसेवक यांच्या कार्यालयात जावून कामासंदर्भात चर्चा करून शासकिय वाहन उभे असलेल्या ठिकाणी परत आले.

त्यावेळी पंच क्र. १ राठोड व पंच क्र. २ मटकर यांच्या समक्ष तक्रारदार यांना लोकसेवक यांचे सोबत काय चर्चा झाली अशी विचारणा केली तसेच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले असता तक्रारदार म्हणाले, " कोकणे साब नमस्कार, जाधव भाई नमस्ते " असे बोलले असता, लोकसेवक जाधव यांनी " क्या बोल रहा है, काम चल रहा है" असे बोलणे केले असता, श्री. भोजनाथ रिशीदेव राय म्हणाले " बैठ के बात कर लो", त्यावर लोकसेवक जाधव यांनी " बुलाता हू, बाद में तेरे को, आता काम चालु आहे नंतर ये " असे सांगितले.

वरील प्रमाणे तक्रारदार श्री. समीर स्वपन मोंडळ यांनी केलेल्या तक्रार अर्जावरून दिनांक २२/१२/२०२५ व दिनांक २९/१२/२०२५ रोजीचे पडताळणी पंचनामे करण्यात आले पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक अनिल जाधव यांनी लाचेची मागणी केलेले संभाषण डिजिटल व्हाईस रेकॉर्डिंग मध्ये स्पष्टपणे दिसून येत आहे. यावरून खार पोलीस ठाणेचे लोकसेवक अनिल जाधव यांनी तक्रारदार श्री. समीर मोंडळ यांना खार पोलीस ठाण्याचे हद्दीमध्ये बीट चौकी क्र. १, खार पश्चिम, मुंबई येथे तक्रारदार यांचे अन्नदाता आहार केंद्र, बीट नं १, खार चौकीच्या हद्दीमध्ये चालवायचे असेल तर हॉटेलवर कोणतीही कारवाई न करण्यासाठी स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी कायदेशीर कर्तव्य करण्यापासून परावृत्त राहणेकरीता दरमहा ५०००/- (अक्षरी पाच हजार) रुपये दयावे लागतील अशी लाचेची मागणी केली म्हणून माझी लोकसेवक पोलीस अनिल जाधव, नेमणुक खार पोलीस ठाणे, बृहन्मुंबई शहर यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (सुधारित २०१८) चे कलम ७ अन्वये सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

माझा जबाब मराठीत संगणकीकृत केला असून तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

( रजनी उंबरकर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.